RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

**महाराष्ट्र शासन**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई**
☎/ 🖷:- ०२२ २७५७१३९१ **Website:www.mahalfa.in** **E.Mail:ad.report@mahalfa.in**

क्र.स्था-१८/ब/संकीर्ण संस्था लेखापरीक्षण शुल्क/ अे अे-३/न.क्र.३९/ ११६३ दिनांक :- 19 MAY 2017

प्रति,

१) सहसंचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर विभाग.

२) सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
सर्व जिल्हे.

विषय :- स्थानिक निधी लेखा विभागाच्या सशुल्क लेखापरीक्षणाचे शुल्क वाढविण्याबत
संदर्भ :- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, ज्ञापन क्रमांक. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३१/कोषा प्रशा-४, दिनांक १६/०५/२०१७

उपरोक्त संदर्भिय ज्ञापनाद्वारे शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतन श्रेणीमध्ये सुधारणा झाल्याने सहाव्या वेतन आयोगाच्या संरचनेनुसार सुधारित लेखापरीक्षण शुल्क आकारणीस मंजुरी दिलेली आहे (प्रत सलग्न).

तरी शासनाने मान्य केलेले लेखापरीक्षण शुल्काचे दर दिनांक १६/०५/२०१७ पासून अंमलात आणण्यात यावे व त्याप्रमाणे लेखापरीक्षण शुल्क आकारणी व वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

१६५५/५

**महाराष्ट्र शासन**

संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा ... 17 MAY 2017 ... शेवित

क्रमांक.संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३१/कोषा प्रशा-४,
दालन क्र.३३७, वित्त विभाग,
मंत्रालय विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०००३२.
दिनांक- १६.०५.२०१७.

**विषय-** स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाच्या सशुल्क लेखा परीक्षणाचे शुल्क वाढविण्याबाबत...

**संदर्भ-** १) महाराष्ट्र शासन वित्त विभाग ज्ञापन क्रमांक-संकिर्ण-१००१/प्र.क्र.२६६/२००१/लोलेस, दिनांक ०२.०६.२००३ रोजीचे ज्ञापन.
२) संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचे क्र.स्था.१८/ब/संकिर्ण संस्था लेखापरीक्षण शुल्क /अेअे-३/नस्ती क्र.३९/३१०, दिनांक ०८.०२.२०१७ रोजीचे पत्र.

**ज्ञापन-**

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागातर्फे करण्यात येणाऱ्या लेखापरीक्षणासाठी मुंबई वित्तीय नियम,१९५९ मधील नियम क्र.१९३ अन्वये ज्या संस्थांकडून लेखापरीक्षण शुल्क आकारले जाते त्या लेखापरीक्षण शुल्काच्या दरात वित्त विभाग शासन ज्ञापन क्र.संकिर्ण-१०९०/प्र.क्र.१७५/९०/विमा, दिनांक १० ऑक्टोबर,१९९० अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. तसेच **पाचव्या वेतन आयोगाच्या** शिफारशींनुसार सशुल्क लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांच्या प्रतिदिन आकारावयाच्या लेखापरीक्षण शुल्कामध्ये वित्त विभाग शासन ज्ञापन क्र.संकिर्ण-१००१/प्र.क्र.२६६/२००१/लोलेस, दिनांक ०२.०६.२००३ अन्वये पुन्हा सुधारणा करण्यात आली आहे.

२. संचालनालय,स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वेतन श्रेणीमध्ये सुधारणा झाल्याने सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेनुसार सुधारित लेखापरीक्षण शुल्क आकारणेसाठीचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये सादर केला आहे.

३. संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्या संदर्भ क्र.२ येथील प्रस्तावान्वये या ज्ञापनाच्या दिनांकापासून खालील प्रमाणे सुधारणा करण्यास शासन मंजूरी देत आहे:-

| अ.क्र. | पदनाम | सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी | सुधारित प्रतिदिन लेखापरीक्षण शुल्क (रू.) |
|---|---|---|---|
| १. | **सहाय्यक संचालक** | (१५६००-३९१००) ग्रे.पे.५४०० | **३६११** |
| २. | **जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी** | (९३००-३४८००) ग्रे.पे.४६०० | **२५८९** |
| ३. | **सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी** | (९३००-३४८००) ग्रे.पे. ४४०० | **२५३९** |
| ४. | **वरिष्ठ लेखापरीक्षक** | (९३००-३४८००) ग्रे.पे.४२०० | **२४८६** |
| ५. | **कनिष्ठ लेखापरीक्षक** | (५२००-२०२००) ग्रे.पे.२८०० | **१५२५** |

AA-3

B/175

४. वित्त विभाग ज्ञापन क्रमांक-संकिर्ण-१००१/प्र.क्र.२६६/२००१/लोलेस,दिनांक ०२.०६.२००३ मधील आदेशांचे याद्वारे अधिक्रमण करून वरीलप्रमाणे सुधारित शुल्क निर्धारणाचे आदेश या ज्ञापनाच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहेत.

यासंदर्भात मुंबई वित्तीय नियम,१९५९ मधील नियम क्र.१९३ मध्ये आवश्यक ती सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अनुदीप दिघे)
उप सचिव,वित्त विभाग.

प्रत,

१. उपसचिव, विनियम कार्यासन, वित्त विभाग यांना वित्तीय नियमावली १९५९ मधील नियम क्र.१९३ मध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याच्या विनंतीसह.
२. महालेखापाल,लेखा व अनुज्ञेयता-१,महाराष्ट्र, मुंबई.
३. महालेखापाल, लेखापरीक्षा-१, महाराष्ट्र, मुंबई.
४. महालेखापाल, वाणिज्य लेखापरीक्षा-१, महाराष्ट्र, मुंबई.
५. महालेखापाल,लेखा व अनुज्ञेयता-२,महाराष्ट्र,नागपूर.
६. महालेखापाल, लेखापरीक्षा-२, महाराष्ट्र,नागपूर.
७. संचालक, लेखा व कोषागारे, ठाकरसी हाऊस,तिसरा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई.
८. संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा,कोकणभवन,६ वा मजला, नवी मुंबई,
९. सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा, मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर
१०. निवड नस्ती, वित्त विभाग/ कोषा प्रशा-४.